# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांक:20.07.2025** **वार:रविवार**

---

१) संसदेचं उद्यापासून पावसाळी अधिवेशन, आज सर्वपक्षीय बैठक
२) व्यसनमुक्त भारतासाठी काशीच्या घाटांवर युवा अध्यात्मिक शिखर सम्मेलन
३) भारत आणि युरोपियन मुक्त व्यापार संघटनेबरोबरचा व्यापार आणि आर्थिक भागिदारी करार १ ऑक्टोबरपासून लागू होणार
४) अन्नप्रक्रिया क्षेत्रात नावीन्य, भागीदारी आणि दीर्घकालीन सहकार्याला चालना देण्यासाठी पुण्यात परिषदेचं आयोजन आणि
५)आंतरराष्ट्रीय गणित ऑलिंपियाडमध्ये भारतीय विद्यार्थ्यांना सहा पदकं

**पावसाळीअधिवेशन**

संसदेचं पावसाळी अधिवेशन उद्यापासून सुरू होत आहे. ते २१ ऑगस्टपर्यंत चालेल. या अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारनं आज दिल्लीत सर्वपक्षीय बैठक बोलावली आहे. अधिवेशनात दोन्ही सभागृहांचं कामकाज सुरळीत व्हावं याकरता सरकार या बैठकीत सर्व पक्षांना सहकार्याचं आवाहन करेल. संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांनी वार्ताहरांशी बोलताना सांगितलं की संसदेत उपस्थित होणाऱ्या सर्व महत्त्वाच्या विषयांवर चर्चा करण्याची सरकारची तयारी आहे. जन विश्वास दुरुस्ती विधेयक २०२५, राष्ट्रीय क्रीडा प्रशासन विधेयक २०२५ यासह इतर अनेक महत्त्वाची विधेयकं या अधिवेशनात चर्चेसाठी येणार असल्याची माहितीही त्यांनी दिली.

**विरोधकबैठक**

संसदेच्या पावसाळी अधिवेशनाच्या अनुषंगानं इंडिया आघाडीच्या नेत्यांची काल दूरस्थ पद्धतीनं बैठक झाली. काँग्रेस, तृणमूल काँग्रेस, समाजवादी पार्टी, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गट, द्रमुक, मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष, राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गट इत्यादी पक्षांचे नेते यामध्ये सहभागी झाले होते. या बैठकीला उपस्थित असलेल्या प्रमुख नेत्यांमध्ये काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे, लोकसभेतले विरोधी पक्षनेते राहुल गांधी, सपाचे रामगोपाल यादव आणि द्रमुकच्या तिरुची शिवा यांचा समावेश होता. अधिवेशनात पहलगाम दहशतवादी हल्ला आणि ऑपरेशन सिंदूर सारखे मुद्दे उपस्थित करण्यावर सर्व नेत्यांची सहमती झाल्याचं काँग्रेसचे खासदार प्रमोद तिवारी यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितलं.

**<u>आमआदमीपक्ष</u>**

दरम्यान आम आदमी पक्ष, इंडिया आघाडीपासून अधिकृतपणे वेगळा झाला असल्यानं पक्षानं या बैठकीत सहभाग घेतला नाही. ही आघाडी २०२४ च्या लोकसभा निवडणुकीसाठी करण्यात आली होती, त्यानंतर आम आदमी पक्षानं हरियाणा आणि दिल्ली विधानसभा निवडणूक स्वतंत्रपणे लढवली अशी माहिती पक्षाचे नेते संजय सिंह यांनी काल माध्यमांना दिली.

**<u>पंतप्रधानव्यसनमुक्तभारत</u>**

व्यसनमुक्त भारतासाठी युवा आध्यात्मिक शिखर सम्मेलन एक महत्वाचं पाऊल असल्याचं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. केंद्रीय युवा कार्यक्रम आणि क्रीडा मंत्री मनसुख मांडविय यांच्या समाज माध्यमावरील संदेशाला उत्तर देताना पंतप्रधानांनी याविषयी माहिती दिली. माय भारत उपक्रमाद्वारे ,विकसित भारतासाठी व्यसनमुक्त युवा या संकल्पनेवर ,काशीच्या पवित्र घाटावर या संमेलनाचं आयोजन करण्यात आलं आहे. हे संमेलन केवळ आध्यात्मिक बैठक नसून मोदी सरकारच्या व्यसनमुक्त भारत उपक्रमाचा एक भाग आहे. युवकांच्या नेतृत्वात आयोजित उपक्रमांच्या माध्यमातून मादक पदार्थांच्या वापरावर बंदी घालणं हा या योजनेचा उद्देश आहे. व्यसनाविरुध्द असलेल्या राष्ट्रीय युवक आंदोलनाची ही सुरुवात असल्याचं मांडवीय यांनी त्यांच्या संदेशात म्हटलं आहे.

**<u>उपराष्ट्रपती</u>**

भारतानं आपला शासकीय कारभार कसा हाताळावा, असं सांगणारी कुठलीही शक्ती या पृथ्वीवर अस्तित्वात नाही, असं उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी म्हटलं आहे. भारतीय संरक्षण संपदा सेवेच्या २०२४ च्या तुकडीच्या प्रशिक्षणार्थी अधिकाऱ्यांना संबोधित करताना धनखड यांनी हे प्रतिपादन केलं. या सार्वभौम देशाचे सर्व निर्णय त्याच्या नेतृत्वाद्वारे घेतले जातात, असंही ते म्हणाले. भारताची ६५ टक्के लोकसंख्या ३५ वर्षांपेक्षा कमी वयोगटातील आहे, ही भारताची सर्वात जमेची बाजू आहे, इतर देशांना याचाच हेवा वाटतो याकडे धनखड यांनी लक्ष वेधलं.

**<u>कॅरिसूची</u>**

आकाशवाणी पुणे केंद्राच्या प्रादेशिक वृत्त विभागात अस्थायी कॅज्युअल रिपोर्टरची सूचि बनविण्याकरिता परीक्षा घेण्यात येत आहे. या परीक्षेसाठी अर्ज करण्याची अंतिम तारीख आज आहे. अर्ज करण्यासाठी newsonair.com या संकेतस्थळावरील वेकन्सीज या टॅबला भेट द्यावी. अधिक माहितीसाठी आपण प्रादेशिक वृत्त विभागाच्या 255 10 506 किंवा 255 32 162 या क्रमांकावर देखील संपर्क साधू शकता.

**<u>गोयल</u>**

भारत आणि युरोपियन मुक्त व्यापार संघटनेबरोबरचा व्यापार आणि आर्थिक भागिदारी करार १ ऑक्टोबरपासून लागू होणार आहे, अशी घोषणा केंद्रीय वाणिज्य मंत्री पीयूष गोयल यांनी काल केली. यामुळं देशात १० लाखांहून अधिक रोजगारांची निर्मिती होईल, असं ते म्हणाले. युरोपियन मुक्त व्यापार

संघटनेत आइसलँड, लिंचेस्टाइन, नॉर्वे आणि स्वित्झर्लंड यांचा समावेश होतो. गेल्या वर्षी १० मार्चला या करारावर स्वाक्षरी झाली होती. यानुसार पहिल्या १० वर्षांत हे देश ५० अब्ज डॉलर्स आणि पुढच्या ५ वर्षांत आणखी ५० अब्ज डॉलर्सची गुंतवणूक करणार आहेत.

**<u>अन्नप्रक्रियाउद्योग</u>**

मराठा चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्रीज अँड ॲग्रिकल्चर, वैज्ञानिक तसंच औद्योगिक अनुसंधान परिषद आणि केंद्रीय अन्न तंत्रज्ञान संशोधन संस्था यांच्या वतीनं पुण्यात अन्नप्रक्रिया उद्योग परिषदेचं आयोजन करण्यात आलं होतं. अन्नप्रक्रिया क्षेत्रात नावीन्य, भागीदारी आणि दीर्घकालीन सहकार्याला चालना देण्यासाठी ही परिषद महत्त्वपूर्ण होती. अडीचशेहून अधिक उद्योजकांनी या परिषदेमध्ये सहभाग घेतला. अन्न सुरक्षिततेची खात्री करण्याच्या हेतूनं उद्योग आणि शैक्षणिक संस्थांच्या दरम्यान अधिक प्रभावी संवाद आणि सहकार्य आवश्यक आहे, असं मत केंद्रीय खाद्य तंत्रज्ञान संशोधन संस्थेच्या संचालिका डॉक्टर श्रीदेवी अन्नपूर्णा सिंग यांनी व्यक्त केलं. तांत्रिक सहकार्य, क्षमता वाढ आणि संयुक्त संशोधन उपक्रमांसाठी सामंजस्य करार या परिषदेमध्ये करण्यात आला. हा करार उद्योगांसाठी उपयुक्त अशा व्यावसायिक तंत्रज्ञान हस्तांतरणाला चालना देईल असा आशावाद या परिषदेमधून व्यक्त करण्यात आला.

**<u>अमितशाहउत्तराखंड</u>**

केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी उत्तराखंडमध्ये काल रुद्रपूर इथं उत्तराखंड सरकारच्या १ हजार २७१ कोटी रुपये किंमतीच्या विविध विकास कामांचं उद्घाटन आणि पायाभरणी केली. रुद्रपूर इथं आयोजित 'उत्तराखंड गुंतवणूक महोत्सव २०२५' मध्ये त्यांनी देशभरातले गुंतवणूकदार आणि उद्योजकांशी संवाद साधला. उत्तराखंडसारख्या लहान राज्यांच्या प्रगतीशिवाय देशाचा विकास होऊ शकत नाही, यासाठीच केंद्र सरकार लहान राज्यं आणि पूर्वेकडच्या राज्यांच्या विकासाकडे विशेष लक्ष देत आहे, असं सांगून शहा यांनी मुख्यमंत्री पुष्कर सिंग धामी यांचं कौतुक केलं. आयुर्वेद, योग, निसर्गोपचार आणि सेंद्रिय शेती उत्तराखंडच्या विकासाचा पाया ठरतील असं शहा यांनी नमूद केलं.

**<u>नागालँडआंबामहोत्सव</u>**

कृषी आणि उद्योजकतेला प्रोत्साहन देण्यासाठी नागालँडच्या किफिरे जिल्ह्यातील लाँगमात्र इथं काल राज्यातला पहिलावहिला आंबा महोत्सव साजरा करण्यात आला. जिल्हा प्रशासन आणि किफिरे फलोत्पादन विभागाच्या वतीनं या महोत्सवाचं आयोजन करण्यात आलं होतं. लाँगमात्र परिसरातील १३ गावांमध्ये मोठ्या प्रमाणात आंबा उत्पादन घेतलं जातं, त्यांनी या महोत्सवात सहभाग घेतला.

**<u>मृत्यू-जालना-प्रशांत-बुडून</u>**

महाराष्ट्रातल्या पंढरपूर इथ चंद्रभागा नदीत ,काल सकाळी स्नान करत असताना बुडाल्यानं ३ महिलांचा मृत्यु झाला.त्यापैकी दोन महिलांचा मृतदेह सापडला असून तिसऱ्या महिलेचा शोध उशिरापर्यंत सुरु होता.

रत्नागिरी तालुक्यात आरे-वारे इथल्या समुद्रकिनारी गेलेल्या चार जणांचा काल बुडून मृत्यू झाल्याची दुर्घटना घडली. त्यात तीन तरुणी आणि एका पुरुषाचा समावेश आहे. समुद्राच्या पाण्यात उतरल्यानंतर

लाटांचा आणि पाण्याचा अंदाज न आल्यामुळं चौघंही जण बुडाले. स्थानिकांनी आणि किनाऱ्यावरच्या रक्षकांनी त्यांना वाचवण्यासाठी केलेले प्रयत्न अयशस्वी ठरले.

**महिला क्रिकेट**

महिला क्रिकेटमध्ये, इंग्लंडनं काल लॉर्ड्स मैदानावर पावसामुळं आखूड झालेल्या पन्नास षटकांच्या दुसऱ्या सामन्यात भारताचा 8 गडी राखून पराभव करत मालिकेत १-१ अशी बरोबरी साधली. भारतीय महिलांनी 29 षटकांत आठ बाद १४४ धावा केला. यजमान संघाला २४ षटकांत ११५ धावांचं लक्ष्य देण्यात आलं, ते त्यांनी एकविसाव्या षटकात पार केलं. निर्णायक तिसरा सामना मंगळवारी खेळला जाईल.

**बुद्धिबळ**

आंतरराष्ट्रीय बुद्धिबळ दिवस आज –प्रत्येक चाल महत्वाची- या मध्यवर्ती संकल्पनेसह साजरा केला जात आहे. बुद्धिबळाच्या पटावर तसंच जीवनात प्रत्येक निर्णय आपल्या जगण्याला आकार देत असतो असा त्याचा मतितार्थ आहे. जागतिक बुद्धिबळ समुदायानं १९२४ मध्ये FIDE च्या स्थापनेचं स्मरण म्हणून हा दिवस निश्चित केला आहे. या वर्षी, FIDE नं "सामाजिक बुद्धिबळ वर्ष" सुरू केलं आहे, या खेळाचा समावेश, शिक्षण, सक्षमीकरण आणि मानसिक कल्याणासाठी एक साधन म्हणून वापर करण्यासाठी समर्पित हा उपक्रम आहे. विश्वनाथन आनंदपासून ते नवीन पिढीतील प्रतिभावानांपर्यंत, भारतीय बुद्धिबळ जादूगार बुद्धिबळाच्या पटाला जागतिक वैभवाच्या मंचात रूपांतरित करत आहेत.

**ऑलिंपियाड**

ऑस्ट्रेलियात आयोजित सहासष्ठाव्या आंतरराष्ट्रीय गणित ऑलिंपियाडमध्ये भारताला ३ सुवर्ण, २ रौप्य आणि १ कांस्य पदकं मिळाली. यामध्ये महाराष्ट्राच्या आदित्य मांगुडीसह, दिल्लीच्या कणव तलवार आणि आरव गुप्ता यांनी सुवर्णपदकावर नाव कोरलं. कर्नाटकचा अबेल जॉर्ज मॅथ्यू आणि दिल्लीचा आदिश जैन यांनी रौप्यपदक मिळवलं, तर दिल्लीच्या अर्चित मानसला कास्य पदक मिळालं. या स्पर्धेत एकंदर ६३० विद्यार्थ्यांनी भाग घेतला होता, त्यापैकी ६९ विद्यार्थिनी होत्या. या वर्षी भारतीय संघानं सर्वाधिक २५२ पैकी १९३ गुण मिळवून एक नवीन विक्रम प्रस्थापित केला.

**याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं.**

**नमस्कार.**